# दिव्य निर्धार

| नागपूर | वर्ष : 10 | अंक : 38 | नागपूर, मंगळवार, दि. ५ ते ११ नोव्हेंबर २०२४ | पाने : ४



## प्रत्येक पाऊल जनतेच्या हितासाठी कामठीच्या सर्वांगीण विकासासाठी





## कामठीच्या विकासासाठी चंद्रशेखर बावनकुळे यांना विजयी करा; भाजप नेते चंद्रशेखर राऊत यांचे आवाहन

**दिव्य निर्धार वृत्तसेवा**

नागपूर : कामठी विधानसभा मतदारसंघासाठी चंद्रशेखर बावनकुळे यांनी गेल्या २५ वर्षांत अनेक प्रयत्न केले आहेत. अनेक गावांचा विकास केला आहे. मौदा आणि कामठी, नागपूर ग्रामीण तालुक्यातील विकासासाठी पुन्हा चंद्रशेखर बावनकुळे यांना विधानसभेत भरघोस मतांनी पाठवा, असे आवाहन उमरगावचे भाजपचे युवा नेता आणि उमरगावचे उपसरपंच चंद्रशेखर राऊत यांनी केले आहे.

कामठी, मौदा आणि नागपूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघातून राज्याचे माजी मंत्री आणि विकासासाठी अहोरात्र झटणारे नेते, भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे हे निवडणुकीच्या रिंगणात आहेत. गेली अनेक वर्षे त्यांनी कामठी मतदारसंघाच्या विकासासाठी झटत आहेत. अनेक नवीन प्रकल्प त्यांनी मतदारसंघात आणून लोकांचा विकास केला आहे.

कामठी, मौदा आणि नागपूर ग्रामीणमध्ये अनेक विकासाची काम करून त्यांनी मतदारसंघाला नवी दिशा देण्याचे काम केले आहे, यामुळे नरसाळा, बेसा, बेलतरोडी व नागपूर ग्रामीणमध्ये त्यांनी अनेक विकासाची कामे केली. नरसाळा, हुडकेश्वर या गावांना नागपूर महानगरपालिकेच्या हद्दीत आणून त्या गावाचा चौफेर विकास केला आहे. यापूर्वी नागपूर शहराच्या हद्दीत आलेली गावांचा विकास बघितला तर त्या वस्त्यांमध्ये अनेक विकासाची कामे शिल्लक आहेत. मात्र, नरसाळा, हुडकेश्वर गावांमध्ये त्यांनी विकासाची कामे केली, रस्ते, वीज, गडरलाईनसाठी विशेष निधी दिला. यामुळे या गावातील प्रत्येक रस्त्याचे डांबरीकरण आणि सिमेंटीकरण झाले आहे. तसेच नागपूर ग्रामीणमधील अनेक गावांचा त्यांनी विकास केला असून याकडे त्यांनी जबाबदारीने लक्ष दिले आहे. नागपूर ग्रामीण, कामठी आणि मौदा तालुक्यातील कोट्यधीचा निधी देऊन त्यांनी त्या गावांना विकासाच्या प्रवाहात आणले आहे. यामुळे या निवडणुकीत त्यांनी बहुमताने निवडून देऊन विकासाला पुन्हा गती द्यावी, असे आवाहनही उपसरपंच चंद्रशेखर राऊत यांनी केले.

**विकास कामांचा दबदबा**

नागपूर ग्रामीण, कामठी आणि मौदा तालुका मिळून कामठी मतदारसंघ बनला आहे. नागपूर ग्रामीणमधील नरसाळा, हुडकेश्वर, पिपळा, बेसा, बलतरोडी, घोगली, बहादुरा, खरबी ही शहराला लागून असलेली गावे.

या गावात त्यांना विकासाचा झपाटा लावला. शहरात गेलेल्या नरसाळा, हुडकेश्वर गावांमध्ये मूलभूत सुविधा उपलब्ध करून दिल्यात. शहरातील अनेक भागाचा विकास झाला नाही, त्याच्या कितीतरी पटीने त्यांनी या भागाचा विकास केला. प्रत्येक ग्रामपंचायत त्यांनी आपल्या ताब्यात घेतली आहे. सरपंच पदाची निवडणूक असली तरी ते स्वतः यात लक्ष घालून पक्षाच्या पदाधिकाऱ्यांना विजयी करतात हे विशेष, असेही चंद्रशेखर राऊत म्हणाले.

CC MM YY KK CC MM YY KK



































CC MM YY KK CC MM YY KK

# अपमान करणाऱ्यांना महिलाच धडा शिकवतील : चंद्रशेखर बावनकुळे यांचे विधान

महाविकास आघाडीच्या नेत्यांजवळ बोलण्यासाठी काहीच मुद्दे नाहीत. मविआच्या सर्व नेत्यांना आव्हान आहे, त्यांनी आपला जाहीरनामा आणावा त्यात जनतेच्या विकासासाठी काय आहे हे दाखववावे. काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी महाराष्ट्रातील लाडकी बहीण, शेतकऱ्यांची वीज बिलमाफी या योजना चुकीच्या असून त्या सरकारला दिवाळखोरीकडे नेतील, असे विधान करून आपला महिला व शेतकरीविरोधी आकस उघड केला. इतकेच नव्हे, लाडकी बहीण योजनेविरुद्ध षडयंत्रही जनतेसमोर आले, असा आरोप भारतीय जनता पार्टीचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी केला.

काँग्रेसचे षडयंत्र आम्ही हाणून पाडू. महाराष्ट्रातील लाडक्या बहिणी आणि भाऊ त्यांना धडा शिकविल्याशिवाय राहणार नाहीत, असेही ते म्हणाले.



माध्यमांच्या प्रतिनिधींशी बावनकुळे बोलत होते. कॉंग्रेसने कर्नाटक, तेलंगणा, हिमाचल प्रदेशमधील महिलांसाठी सुरू असलेल्या योजना बंद पाडल्या किंवा जाहीर करून त्या पूर्ण केलेल्या नाहीत. काँग्रेसने मतदारांची फसवणूक केली. महाविकास आघाडीच्या नेत्यांजवळ बोलण्यासाठी काहीच मुद्दे नाहीत. मविआच्या सर्व नेत्यांना आव्हान आहे, त्यांनी आपला जाहीरनामा आणावा त्यात जनतेच्या विकासासाठी काय आहे हे दाखववावे.

आम्ही सांगतो आहोत की, लाडक्या बहिणींना पाच वर्षांपर्यंत दरवर्षी 18 हजार रूपये देऊ, मध्यमवर्गीयांच्या घरांचे सूर्यघर योजनेतून वीज बिल माफ करू. पीक विमा योजना देऊ, त्याप्रमाणे मविआच्या नेत्यांनी जाहीर करावे. याकडे लक्ष वेधून बावनकुळे म्हणाले, महाविकास आघाडीचे नेते भाऊबिजेच्या दिवशी महिलांचा अपमान करत असून, आजचे संजय राऊत यांचे विधान महिलांचा अपमान करणारे आहे. अपमान करणाऱ्यांना महिलांनी चप्पल दाखविली पाहिजे, महिलांचा अपमान लाडक्या बहिणी कदापिही सहन करणार नाहीत. त्यांना निवडणुकीच्या माध्यमातून धडा शिकवेल आणि वचपा काढतील. **राहुल गांधींचा खोटारडेपणा खोडून काढू** राहुल गांधी यांनी अमेरिकेत जाऊन भारतातील एससी, एसटी आणि ओबीसींचे आरक्षण संपविण्याची भाषा केली आहे. नाना पटोले हे त्यांचे समर्थन करतात. देशाला आरक्षणाची गरज नाही, असे म्हणणाऱ्या राहूल गांधी यांना आम्ही जाब विचारू, असेही त्यांनी म्हटले आहे.

## कामगार नेते ते ऊर्जामंत्री...

"राज्याचे माजी ऊर्जामंत्री आणि भाजपचे सरचिटणीस चंद्रशेखर बावनकुळे यांचा प्रवासही खडतर आहे. सुरवातीला कोराडी ते नागपूर या मार्गावर बावनकुळे रिक्षा चालवायचे. त्यानंतर कोराडी मधील कोराडी महाऔष्णिक विद्युत केंद्रातील लहान मोठे कंत्राट घेऊन त्यांनी कंत्राटदार म्हणून काम सुरु केले. "औष्णिक वीज केंद्रात कंत्राटदार म्हणून काम करतांना प्रकल्पातील कंत्राटी कामगारांचे प्रश्न ते उचलू लागले. पुढे त्यांनी स्वतःची ओळख कोराडी औष्णिक वीज केंद्रातील कामगार नेते म्हणून तयार केली. "कामगार आंदोलनातूनच त्यांना नितीन गडकरी यांच्यासारखे मार्गदर्शक लाभले आणि त्यांच्या राजकीय प्रवासाला सुरुवात झाली. बावनकुळे राजकारणात जेव्हा नवखे होते तेव्हा महाराष्ट्रात भाजपचं एवढं प्रस्थ नव्हतं. पण तरी ही त्यांनी गडकरींच्या नेतृत्वाखाली काम करायला सुरुवात केली. "दरम्यान जिल्हा परिषदेच्या निवडणूका लागल्या. बावनकुळेंना भाजपने उमेदवारी दिली. त्यांनीही संधीच सोनं केलं आणि ते निवडून आले. त्यावेळी जिल्हा परिषदेत काँग्रेसची सत्ता होती. ही निवडणूक त्यांच्यासाठी टर्निंग पॉइंट ठरली. जिल्हा परिषदेतील सर्वाधिक सक्रिय सदस्य म्हणून अल्पावधीतच त्यांना प्रसिद्धी मिळाली. "पुढे जेव्हा विधानसभेच्या निवडणूका लागल्या तेव्हा कामठी विधानसभा मतदारसंघासाठी इतर पक्षांकडून रिंगणात तगडे उमेदवार देण्यात आले होते. काँग्रेसने दिग्गज नेते मुकुल वासनिक यांना उमेदवारी दिली. तर तत्कालीन आमदार व राज्यमंत्री सुलेखा कुंभारे यांनी काँग्रेसला सोडचिठ्ठी देत बहुजन रिपब्लिकन एकता मंच नावाचा पक्ष स्थापन करून निवडणुकीत उडी घेतली. भाजपकडे फारसे तगडे उमेदवार नव्हते. तेव्हा बड्या नेत्यांच्या लढाईत बावनकुळे यांना भाजपने उतरवले. त्यावेळी बावनकुळेंना डमी उमेदवार म्हणून हिणवलं गेले. मात्र त्यांनीच विजयाचं निशाण रोवलं. तेव्हापासून त्यांनी सलग तीन निवडणुका जिंकल्या.भाजपची सत्ता येताच मंत्रिपदाचा कुठलाही अनुभव नसताना त्यांना ऊर्जा खात्याचे कॅबिनेट मंत्री करण्यात आले होते.

# चंद्रशेखर बावनकुळे यांच्या प्रचाराचा गावागावांत धडाका

### येणार तर कमळच, भाजप युवा नेते चंद्रशेखर राऊत यांचा दावा

**दिव्य निर्धार : वृत्तसेवा**

नागपूर : राजकारणातील सारीपाटावर विरोधकांना नेहमी मात देणारे भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांचा झंझावाती प्रचार सुरू असून गावागावांत लोकांना भेटी देत आहेत. यामुळे त्यांच्या प्रचाराच्या धडाक्यात कामठी विधानसभा मतदारसंघात कमळच फुलणार असल्याचा दावा भाजपचे युवा नेते आणि उमरगावचे उपसरपंच चंद्रशेखर राऊत यांनी केला आहे. कामठी विधानसभा मतदारसंघातून भाजपचे ज्येष्ठ नेते चंद्रशेखर बावनकुळे हे निवडणूक लढवित असून त्यांच्या प्रचाराचा नारळ फुटला आहे. गावागावांत ते भेटी देत आहे. गावातील लोकांची विचारपूस करून त्यांच्या सुख-दुःखात सहभागी होत आहे. त्याप्रमाणे दिवाळीच्या शुभेच्छा देत असून त्यांना विकास करण्याचे आश्वासन देत आहे. कामठी मतदारसंघातील कार्यकर्त्यांना लोकांची सेवा करण्याच्या सूचना देत आहे. प्रत्येक गावातील पदाधिकाऱ्यांनी प्रचारासाठी एकजुटीने काम करावे, असे आवाहनही चंद्रशेखर राऊत यांनी केले आहे. कामठी मतदारसंघातील भाजपचा विजय म्हणजे राज्याचा विजय आहे. चंद्रशेखर बावनकुळे भाजपचे प्रदेशाध्यक्ष असून संपूर्ण राज्यातील निवडणुकीची जबाबदारी ही त्यांच्यावर आहे. यासाठी प्रत्येक पदाधिकाऱ्यांनी त्यांचे हात मजबूत करून त्यांना बहुमतांनी निवडून द्यावे. कामठी, नागपूर ग्रामीण आणि मौदा तालुक्याच्या विकासासाठी चंद्रशेखर बावनकुळे साहेब निवडून येणे गरजेचे असून त्याच्यामुळे तिन्ही तालुक्याचा विकास झपाट्याने होणार आहे. नागपूर ग्रामीणमधील अनेक गावांचा विकास त्यांनी केला आहे. आणखी विकास करण्याची गरज आहे. याकरिता त्यांना प्रचंड बहुमताने निवडून देणे आवश्यक असल्याचे मत भाजपचे युवा नेते व उमरगावच्या विकासाचे शिल्पकार चंद्रशेखर राऊत यांनी व्यक्त केले.



# माविआच्या नऊ नेत्यांना मुख्यमंत्री पदाचे दिवास्वप्न!

### चंद्रशेखर बावनकुळे यांची जोरदार टीका; कामठी तालुक्यातील कार्यकर्त्यांशी संवाद

**दिव्य निर्धार : वृत्तसेवा**

**नागपूर** : विधानसभा निवडणुकीत सरकार स्थापन करून आपणच मुख्यमंत्री होणार असल्याचे स्वप्न महाविकास आघाडीतील ९ नेते पाहत आहेत, अशी जोरदार टीका भारतीय जनता पक्षाचे प्रदेशाध्यक्ष आणि कामठी-मौदा मतदार संघातील भाजपचे उमेदवार चंद्रशेखर बावनकुळे यांनी केली. त्यांचे हे स्वप्न मुंगेरीलाल के हसीन सपने असून ते केवळ दिवास्वप्न ठरतील, असाही टोला त्यांनी लगावला. येरखेडा येथील नागरिकांद्वारे कुसुमताई संगेवार सभागृहात आयोजित दिवाळी मिलन सोहळ्यात ते बोलत होते. मंगळवारी श्री. बावनकुळे यांनी कामठी तालुक्यातील येरखेडा नगरपंचायत क्षेत्र, होमथळा पंचायत समिती क्षेत्र, महालगाव पंचायत समिती क्षेत्र, वडोदा पंचायत समिती क्षेत्र, तरोडी पंचायत समिती क्षेत्र, बिडगाव नगरपंचायत क्षेत्रातील बिडगाव व तरोडी, शिरपूर व महादूला येथे विविध कार्यक्रमात सहभाग नोंदविला. उद्धव ठाकरे, आदित्य ठाकरे, नाना पटोले, बाळासाहेब थोरात, विजय वडेट्टीवार, पृथ्वीराज चव्हाण, सुप्रिया सुळे, जयंत पाटील आणि रोहित पवार यांचे स्वप्न पूर्ण होणार नाही, असे सांगून त्यांनी महाविकास आघाडीतील काँग्रेसवर कडवट टीका केली. श्री बावनकुळे म्हणाले, लोकसभा निवडणुकीत काँग्रेसने खोटे आश्वासन देऊन मतदारांना फसवले. पंतप्रधान नरेंद्र मोदी संविधान बदलणार आणि आरक्षण रद्द करणार असल्याचे भ्रामक प्रचार करून काँग्रेसने रामटेक मतदार संघात विजय मिळवला होता. परंतु, आगामी निवडणुकीत मतदारांनी काँग्रेसच्या भूलथापांना बळी पडू नये, असे आवाहन



बावनकुळे यांनी केले.काँग्रेसचे सुनील केदार यांच्यावर टीका करताना बावनकुळे म्हणाले की, शेतकऱ्यांचे दीडशे कोटी रुपये हडप करणाऱ्या केदार यांना न्यायालयाने शिक्षा दिली आहे. २२ वर्षांपूर्वी झालेल्या या घोटाळ्यामुळे त्यांनी ५ वर्षांची शिक्षा भोगली असून, आता ते जामिनावर सुटले आहेत. असे असताना, काँग्रेसची प्रतिष्ठा वाचवण्यासाठी ते निवडणुकीच्या मैदानात उतरले आहेत, जो माणूस स्वतः जामिनावर असताना तो या विधानसभा मतदारसंघात काँग्रेसचा जामीन घेत आहे, हे हास्यास्पद आहे. येरखेडा ग्रामपंचायतीला नगरपंचायतीचा दर्जा देण्यासाठी आपले प्रयत्न सुरू असल्याचेही बावनकुळे म्हणाले. नगरपंचायत मिळाल्यास नागपूर शहरासारखा विकास या भागात निश्चितपणे होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. यासाठी ग्रामपंचायतीच्या सर्व सदस्यांची मंजुरी घेऊन, येरखेडा ग्रामपंचायतीला नगरपंचायतचा दर्जा मिळवून देण्याचे आश्वासनही त्यांनी दिले. कार्यक्रमाला आमदार टेकचंद सावरकर, अनिल निधान, उमेश रडके, पंकज साबळे, देवेंद्र गवते, उन्मेष महल्ले, मंगला कारेमोरे, जया भस्मे, देवेंद्र गवते, मनीषा कारेमोरे, इश्वरचंद चौधरी, आशिष वंजारी, राजकिरण बर्वे, कुबेर महिल्ले, स्वप्नील शिवणकर, नरेश मोहाबे, मंगला करेमोर, जया भस्मे, मंदा महल्ले, राजश्री घिवले, शीतल चौधरी, रेणुका गुज्जेवर, सुनीता अगासे, राकेश खरोले, संदीप पोहेकर, राकेश काळे, मुकेश कानोजिय, रमन पाचे, राजेश पिपरेवर, सरिता भोयर, सुशांत काळे, पंकज साबळे, राजेंद्र बैस, राकेश मेटकर, शुभम वाडी भस्मे, गजानन तिरपुडे, राकेश भस्मे, वंदना बावणे, सुमेध दुपरे, अमोल घडले, प्रवीण भोंगाडे, कविता रायबोले, मो. तारिक भाई यांसह मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

# कामठीवासींनी निःस्वार्थ सेवेची व्यक्त केली कृतज्ञता

## चंद्रशेखर बावनकुळे यांनी घेतल्या नागरिकांच्या गाठीभेटी

नागरिकांच्या भेटी, संवादातून दिसली स्नेहाची साखळी आगळी-वेगळी संस्कृतीसह शांती, सद्भाव आणि आनंदायी वातावरणाची निर्मिती करण्यात लोकप्रतिनिधींचे महत्व अनन्यसाधारण आहे. अशी ओळख तयार करण्यासाठी श्री चंद्रशेखर बावनकुळे यांची मोलाची भूमिका बजावली असल्याची भावना सोमवारी कामठी शहरात दिसून आली. कामठी शहरातील अनेक ज्येष्ठ नागरिकांच्या घरी जाऊन त्यांनी भेट दिली. नागरिकांचा स्नेह आणि आशीर्वाद घेतले. प्रत्येक घरात श्री बावनकुळे यांचे भावनिक शब्द, कृतज्ञतेची भावना आणि निःस्वार्थ सेवेची आकांक्षा स्पष्ट जाणवत होती.कामठी विधानसभा मतदार संघातील भाजपाचे उमेदवार श्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आपल्या निवडणूक प्रचारात कामठी शहरात नागरिकांशी संवाद साधला. कामठीचे ज्येष्ठ नागरिक श्री जयप्रकाश तिवारी यांच्या घरी भेट दिली. तिवारी कुटुंबीयांचे आशीर्वाद घेतले. यावेळी तिवारी कुटुंबातील कन्या अर्चना तिवारी एमबीए शिक्षणासाठी अमेरिकेत जात असल्याची माहिती मिळताच श्री बावनकुळे यांनी आपुलकीने अर्चनाला तिच्या शिक्षणाविषयी माहिती जाणून घेतली सोबतच आवश्यक मदत करण्याचा विश्वास दिला. त्यांच्या या आश्वासन दिले. त्यांच्या या वचनाने तिवारी परिवाराला दिलासा मिळाला आणि त्यांनी कृतज्ञतेने बावनकुळे यांना आशीर्वाद दिला. तिवारी कुटुंबासह अन्य परिवारांनीही त्यांना निवडणुकीत विजयाचा आशीर्वाद दिला, आणि या निवडणुकीत बावनकुळे यांचे एकात्म आणि सेवाभावी नेतृत्व कामठी शहरासाठी नवा आदर्श ठरेल, असा विश्वास व्यक्त केला. कामठी शहरातील त्यांचा निवडणूक प्रचार दौरा असला तरी राजकीय कृत्य नव्हे, तर समाजातील सर्व घटकांशी जोडलेली एक स्नेहाची साखळी असल्याचे चित्र दिसून आले.

त्यांनी मोहनलालजी अग्रवाल, मेहरोलिया नागेशजी शुक्ला, दिनेश स्वामी चंदू लांजेवार, बबलू तिवारी, कपुर कनोजिया, सादफ, खान साहेब, खलील, उमेश मस्के, मनिष सराफ, विरेंद्र बोरकर, रमेश वैद्य, प्रमादे कातोरे, भोला सिंग बैस, रामकिशन खंडेलवाल यांच्या घरी भेटी दिल्या.

कामठीच्या गोराबाजार परिसरातून भेटीच्या कार्यक्रमाला सुरुवात करतील. त्यानंतर जुना गोदाम, मॉल रोड, भाजी मंडी, कोलसाटाल, पिली हवेली चौक, फुटाना ओली, सराफा बाजार, ओली नंबर २, तिलक नगर, गोयल टॉकीज, जुनी ओली, ओकारेश्वर मंदिर, यादव नगर, हमालपुरा या भागात नागरिकांशी संवाद साधला. त्यांच्या या दौऱ्यात आ. टेकचंद सावरकर, माजी मंत्री सुलेखाताई कुंभारे, अजय अग्रवाल, लाला खंडेलवाल, मनीष वाजपेयी, राज हाडोती, कपील गायधने, पंकज वर्मा, विजय कोंडुलवार, विवेक मंगतानी, आशू अवस्थी, संजय कनोहिया, कुणाल सोलंकी, अंश खंडेलवाल, लालू यादव, टिक्कू यादव, मंगेश यादव, गोपाल सिरीया, योगेश गायधने, सुनील मेश्राम, अजय कदम, वंदना भगत, दीपंकर गणवीर, अफजल अंसारी, दीपक सिरीया, उदास बंसोड, सुभाष सोमकुवर, अंकुश बांबोर्डे, अनुभव पाटील, तिलक गजभिये, मनोहर गणतीर, अशोक नगरारे, रेखा भावे, रजनी लिंगायत, नंदा गोडघाटे, रजनी गजभिये, रेवा पाटील, उषा भावे, विशाखा गेडाम, विष्णू ठवरे, चंद्रशेखर लांजेवार, राजेश शंभरकर, सुनील वानखेडे, सचिन नेवारे, चंदू कापसे, महेंद्र मेंढे, नरेंद्र चव्हाण, सुशील तायडे, वंदना आळे, मंदा लोणारे, शशीकला मेश्राम, वंदना कांबळे, संगीता मानवटकर, भूमीका लोणारे, छाया फुलडोले, सुनीता पाटील, सुलभा बोस्कर, विमल लोणारे यांच्यासह इतर मान्यवर, कार्यकर्ते व नागरिक उपस्थित होते.

# बावनकुळे साहेबांमुळे मिळाली उमरगावाच्या विकासाला गती

## मा. सरपंच व वि. उपसरपंच चंद्रशेखर राऊत यांचे मनोगत

**दिव्य निर्धार : वृत्तसेवा**

**नागपूर :** चंद्रशेखर राऊत आणि उमरगाव याचे समीकरण म्हणजे विकास कामांचे. गावाचा विकास झाला पाहिज ही तळमळ त्यांच्या नसानसात भरली आहे. उमरेड- नागपूर मार्गावरील हे उमरगाव आता शहराच्या कक्षेत येत आहे. ग्रामीण भागात राहूनही त्याचा शहरीकरणाचा जो सोनेरी मुलामा मिळाला तो चंद्रशेखर राऊत यांच्यामुळे. युवा नेता आणि राजकारणी म्हणून त्यांची ओळख आहे. कामठी विधानसभा निवडणुकीच्या रिंगणात असलेले भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांचा त्यांना आशीर्वाद आहे. गावाच्या विकासासाठी कधीही मदत करतात आणि धावून येतात. यामुळे चंद्रशेखर राऊत यांनी गावाच्या विकासाला जी सोनेरी झालर दिली. याविषयी उपसरपंच चंद्रशेखर राऊत यांचे मनोगत.



गेल्या अनेक वर्षांपासून मी राजकारणात आहे. अनेक राजकारणी लोकांसोबत अगदी जवळचा संबंध आहे. गावातील राजकारणाला अधिक महत्व आहे. त्यामुळे उमरगावच्या विकासासाठी झटण्याचा प्रयत्न केला. त्याला बऱ्यापैकी यश मिळाले. प्रथम मी ग्रामपंचायत सदस्य झालो. त्यानंतर २०१७ मध्ये जनतेतून थेट सरपंच निवडणूक सुरू झाली. ग्रामपंचाय सदस्य म्हणून मी केलेली काम लोकांना भावली. लोकांसोबत माझाल दांडगा संपर्क आहे. यातून मला सरपंच म्हणून भरघोस मतांनी मला निवडून देण्यात आले. गेल्या आठ वर्षांत लोकांसोबत अधिकाच जुळल्या गेलो. त्यामुळे मला लोकांच्या समस्या अधिक जवळून पाहण्याच योग आला. त्यांच्यात सुखदुःखात सहभागी होता आले. यातून लोकांच्या विकासासाठी गावातील राजकारण करण्याचा निर्णय घेतला. गेल्या आठ वर्षातील राजकीय कारर्किद चांगली राहील. लोकांचा विकास करण्याचा जो ध्यास घेतला होता तो पूर्ण करण्याचा प्रयत्न केला आहे, असे चंद्रशेखर राऊत म्हणाले. चंद्रशेखर राऊत म्हणाले की उमरगाव हे अगदी शहराला लागून आहे. त्यामुळे या गावाकडे सर्वाच्या नजरा लागून आहे. अनेक राजकीय नेते निवडणुकीच्या माध्यमातून गावात येतात. त्यामुळे येतील लोकांना गावाचा विकास कसा असतो, हे दिसून आले आहे. त्यामुळे गावाच्या विकासासोबत सौंदर्यात भर पाडण्याचा निर्णय घेतला आहे. गाव नागपूर -उमरेड मार्गावर असल्यामुळे गावात येणाऱ्या प्रत्येक पाहुण्यांना गावाचे महत्त्व कळायाला पाहिजे म्हणून गावाच्या सुरुवातीलाच सुंदर प्रवेशद्वार बनविण्यात आले. गावात लोकवर्गणीतून भव्यदिव्य प्रवेशद्वार उभे करून गावाकडे लक्ष वेधून घेतले. उमरगावच्या विकासचे जणूकाही प्रवेशद्वारच आहे. माझ्या विचार संकल्पनेतून साकारलेल्या प्रवेशद्वाराचे अनेकांनी कौतुक केले.गावात सुरुवातील रस्ते नव्हते. गावाच्या विकासाचा विचार करीत असताना आपण सुरुवातील रस्ते विकासावर बोलूया. गावात पक्के रस्ते नव्हते. महत्वाचे म्हणजे मुख्य रस्त्यापासून गावात जायला योग्य रस्ता नव्हता. मा. चंद्रशेखर बावनकुळे जिल्ह्याचे पालकमंत्री असताना ही समस्या त्यांना सांगितली. त्यांनी काळजी न करण्याचे आश्वासन दिले. काही दिवसाच मुख्य रस्त्यापासून तर गावापर्यंत सिमेंट रस्ता तयार करण्यात येत असल्याचे मंजुरीपत्र मिळाले. चंद्रशेखर बावनकुळे यांच्या प्रयत्नामुळे कोट्यवधी रुपये खर्च करून रस्ता तयार करण्यात आला. गावातील विकासाला हे मोठे बळ मिळाले. त्या प्रवेशद्वारापासून तर गावापर्यंत कोट्यवधींच्या निधीतून सिमेंट रस्ता तयार करण्यात आला. त्यामुळे उमरगावच्या विकास सुसाट होऊ लागला,असे चंद्रशेखर राऊत म्हणाले. चंद्रशेखर राऊत म्हणाले की नागपूरच्या मुखावर असलेले उमरगावात पूर्वी अनेक सुविधा होत्या असे नाही. गावात पाणीटंचाईमुळे गावकरी हैराण व्हायचे. त्यामुळे गावातील लोकांमध्ये असंतोष होता. गावाच्या विकासाकडे कोणीच लक्ष देत नाही, अशी कुजबूज होती. त्यामुळे गावातील पाणी समस्येवर तोडगा काढला. जलसुविधा निर्माण केली. दोन बोअरवेल खोदल्या. त्यातील पाणी विहिरीत सोडले. त्यातून त्यांनी पाणीटंचाईवर मात केली. पूर्वी पाणीटंचाईवर मात करण्यासाठी गावातील विहिरीचे अधिग्रहण करण्यात येत होते. आता तर मुबलक पाणी आहे. यानंतरही जलस्वराज्य योजनेतून २४ लाखांची कामे केली. २० हजार लिटरची पाण्याची टाकी आणि ८०० मीटरपर्यंत पाइप लाइन टाकण्यात आली. गावात कधीकाळी पाणीटंचाई असायची हेसुद्धा गावकरी विसरले आहेत. कितीही उन्हाळा आला तरी गावात पाणीटंचाईचे नाव दिसून येत नाही. गावातील लोकांना आता मुबलक पाणी मिळत आहे. मुख्य रस्त्यापासून गावातपर्यंत सिमेंट रस्ता झाला. पण गावातील रस्ते साधे होते. त्याचे सिमेटीकरण करण्याचा निर्णय घेतला. जनसुविधांमधून १२ लाखांचा गावात सिमेंट रस्ता बांधला. गावातील प्रत्येक रस्त्याचे काम केले. सोबतच स्मशानभूमीचे सौंदर्यीकरण आणि संरक्षण भिंत बांधून मरणानंतरच्या यातनेपासून मृतदेहाचीही सुटका केली. आमदार आणि माजी ऊर्जामंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचे आमच्या गावावर विशेष प्रेम आहे. निधीसाठी केव्हाही त्यांच्याकडे गेलो की गावाच्या विकासासाठी निधी कमी न पडू देण्याचे आश्वासन देतात आणि त्यांनी ते शेवटपर्यंत आश्वासन पाळले आहे. मुख्य महामार्गापासून तर गावापर्यंत विद्युतीकरण करण्यात आले. गावात हायमास्ट लाइट लावण्यात आले. १५ व्या वित्त आयोगातून सिमेंट रस्त्याचे बांधकाम केले.



तर आमदार टेकचंद सावरकर यांच्या निधीतून गावात सिमेंट रस्ते बांधले. आता गावातील पूर्ण रस्ते सिमेंट रस्ते झाले, असे चंद्रशेखर राऊत म्हणाले.चंद्रशेखर राऊत म्हणाले की गावातील लोकांना पिण्याच्या पाण्याची सोय नव्हती. मात्र, आता लोकांना सकाळी २० लिटर गरम पाणी देण्याचा निर्णय घेतला; आणि त्याची अमलबजावणी करण्यात येत आहे. आमच्या गावातील लोक कधी काळी पाणीटंचाईमुळे हैराण होते. त्या गावात सकाळी सकाळी अंघोळीसाठी २० लिटर गरम पाणी मिळत असेल तर यापेक्षा चांगला विकास राहू शकतो का?, येथील ग्रामस्थांना २०लिटर गरम पाणी अंघोळीसाठी देण्यात येते. हा प्रयोग यशस्वी केला आहे. येथील वॉर्ड क्रमांक ३ मध्ये आर्थिक दुर्बल घटकांसाठी त्यांनी ही योजना यशस्वीरीत्या कार्यान्वित केली आहे. सकाळी ६ ते ९ वाजतापर्यंत गरम पाणी मिळते. तळागाळातील लोकांच्या विकासाची मला तळमळ आहे. गावातील प्रत्येकाचा विकास झाला पाहिजे, असे मला वाटते. यासाठी मी सतत पर्यंत करतो. गावातील लोकांना शुद्ध पाणी मिळावे याकरिता त्यांनी आरओ सुरू केला. तेथे थंड आणि साधे असे दोन्ही प्रकारचे पाणी मिळते. शिक्षणालाही त्यांना महत्त्व दिले. जिल्हा परिषद दोन वर्ग खोल्यांचे बांधकाम केले. यासाठी २१ लाखांचा निधी खेचून आणला. गावातील मूलभूत सुविधांवर त्यांनी भर दिला आहे. प्रत्येकांना चांगल्या सुविधा मिळाल्या पाहिजे, यावर ते सतत बोलत असतो. गावातील सामाजिक सलोखाही जपला आहे. चंद्रशेखर राऊत म्हणाले की मुख्य रस्त्यावरील स्वामी नित्यानंद महाराज यांचे मंदिर तीर्थ क्षेत्रातील ‘क’ वर्गात आणून त्याचा विकास केला. ३५ लाखांचे त्यांनी भक्त निवास बांधले.

तसेच २५ लाखांची संरक्षण भिंत बांधली. एवढेच नव्हे तर त्यांनी मंदिरात जाण्यासाठी १० लाखांचा सिमेंट रस्ताही बांधला.गावातील प्रत्येक भागात रस्ते आणि सुविधांवर त्यांनी भर दिला. नितीन राऊत ते पांडुरंग चाफले यांच्या घरापर्यंत सिमेंट रस्त्याचे बांधकाम केले. दलितवस्ती योजनेतूनही त्यांनी सिमेंट रस्ते बांधले.तर पंचायत समितीच्या फंडातून गावातील सौंदर्यीकरणावर भर दिला, असेही असे चंद्रशेखर राऊत म्हणाले.

# कळमना, विहिरीगावसह अनेक गावांच्या विकासाची चंद्रशेखर बावनकुळे साहेबांनी घेतली हमी

## मा. सरपंच व वि. उपसरपंच चंद्रशेखर राऊत यांचे आश्वासन

**दिव्य निर्धार : वृत्तसेवा**

**नागपूर .** नागपूर ग्रामीण तालुक्यातील शेकडो गावात विकासाची गंगा आणण्याचे आश्वासन भाजपचे प्रदेशाध्यक्ष आणि कामठी मतदारसंघाचे उमेदवार चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली आहे. त्यामुळे कळमना, विहिरगाव, कापसी (बाराद्वारी), हुडकेश्वर, चिकन, सालई, कालडोंगरी, खरसोली, वेळा (हरी) अड्याळीसह शेकडो गावातील मतदारांनी बावनकुळे साहेबांना मतदान करावे, असे आवाहन उमरगावचे मा. सरपंच व वि. उपसरपंच चंद्रशेखर राऊत यांनी केले आहे. कामठी मतदारसंघाचे भाजपचे उमेदवार चंद्रशेखर बावनकुळे यांनी प्रचारात आघाडी घेतली आहे. गावागावांत त्यांच्या विकास कामाची चर्चा असून आयेगा तो चंद्रशेखर बावनकुळे असे नारे लागत आहेत. यामुळे सर्वत्र त्यांचा मौहोल दिसून येत आहे. नागपूर ग्रामीण तालुक्यातील शेकडो गावाना चंद्रशेखर बावनकुळे यांनी विकासाची झालर दिली आहे.

गावागावांत योजना राबवून लोकांचे जीवनमान उंचाविण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळे अनेक गावातील मतदारांनी त्यांचे आभार मानले असून विधानसभेत त्यांना पोहोचविण्याचा निर्धार केल्याचा दावा चंद्रशेखर राऊत यांनी केला आहे. नागपूर ग्रामीण तालक्यातील कळमना, विहिरगाव, कापसी(बाराद्वारी), हुडकेश्वर, चिकन, सालई, कालडोंगरी, खरसोली, वेळा (हरी) अड्याळीसह अनेक गावात विकास योजना आणून त्यांच्या विकास भर पाडण्यात येणार आहे. त्यामुळे मतदारांना आनंदाचे वातावरण असून चंद्रशेखर बावनकुळे यांना येत्या विधानसभेत पाठविण्याचा चंग मतदारांनी बांधला आहे. कामठी विधानासभा मतदारसंघातील प्रत्येक गावाला स्मार्ट गाव बनवून तिथे विकासाची गंगा आणण्याचे आश्वासनही चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिल्याचा दावा उमरगावचे मा. सरपंच व वि. उपसरपंच चंद्रशेखर राऊत यांनी केला आहे.